महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 | वर्ष - ११ वे | अंक क्र. - २४५ | शनिवार दि. १९ एप्रिल २०२५ | किंमत - १ रूपया | पाने - ४

WWW.DAILYAWAZ.COM

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!

पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.

✽ संपादक ✽

मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

## मांधा येथील शेतक-यांवर बिबट्याचा हल्ला, कानाचा व मानेचा तोडला लचका, शेतकरी गंभीर जखमी.

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण पवार, हतगड.- सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण वन परि क्षेत्रा-



तील मांधा येथील एका शेतक-यांवर बिबट्या ने हल्ला केला असून शेतकरी गंभीर जखमी झाला आहे. याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी उंबरठाण यांच्या कडून समजले की, सिताराम मलू ठाकरे वय ४४ वर्ष रा. मांधा हा शेतकरी दि.१८/४/२०२५ रोजी पहाटे उठून दूध डेअरीत दुध भरणे कामी गेला होता. तेथून परतल्यानंतर मालकीच्या जमीनीत घराजवळच्या शेतात सकाळ सहा ते साडे सहा वाजेच्या सुमारास घरकुलाचा पाया खोदकाम करीत असतांना बिबट्याने अचानक झडप मारीत मानेवर पायावर, डोक्यावर हल्ला चढवला नखांनी ओरबाडून कानाचा व मानेचा चावा घे-तला. रक्तस्राव सुरू झाल्याने शेतकरी रक्तबंबाळ झाला. बचावा करीता आरडाओरडा केल्याने घरा शेजारील नातेवाईक लाठ्या काठ्या घेऊन आल्याने बिबट्या ने जंगलाच्या दिशेने धुम ठोकल्याने अनेकांचा जीव भांड्यात पडला. नातेवाईकांनी तात्काळ उपचारासाठी पांगारणे येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे तात्पुरते उपचार झाल्यावर सुरग-ाणा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.पुढील उपचारासाठी नाशिक येथील जिल्हा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. उंबरठाण वन परिक्षेत्र अधिकारी गणेश माळी यांनी घटनेची तात्काळ दखल घेत रुग्णाची सुरगाणा ग्रामीण रुग्णालयात भेट घेत पाहणी केली. पुढील तपास वनविभागाचे अधिकारी करीत आहेत.

## मद्यपींचे आयुष्य धोक्यात... भरभरून येतोय 'डी' माल खोक्यात!

### राज्य उत्पादन शुल्क झोपलेय का? नकली दारूमुळे तरुणांचे तरुणपणी जाणे, अपघातांचे वाढते प्रमाण चिंतेची घंटा!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी) -
दारू ही सवय म्हणून सुरुवात होते, पण सध्या ती मृत्यूकडे ओढणारा मार्ग ठरत आहे. नांदगाव तालुका आणि शहरात 'डी' माल नावाची घातक नकली दारू मोठ्या प्रमाणावर विक्रीस येत असून, यामुळे अनेकांचे आयुष्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा थेट आरोप नागरिकांमधून होत आहे.

राज्य उत्पादन शुल्क झोपलेय का?
'डी' माल म्हणजे नकली रसायनांनी बनवलेली दारू, जी अतिशय घातक असूनही खुलेआम विक्रीस येत आहे. त्याची वाहतूक, वितरण व विक्री सर्व काही उघडपणे सुरू असूनही राज्य उत्पादन शुल्क विभाग कोणतीही कारवाई करताना दिसत नाही.

जनतेचा थेट सवाल आहे - खाकीवाल्यांच्या डोळ्यादेखत जर खोक्याने विष विकले जात असेल, तर मग राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपलेय का?

तरुणांचे तरुणपणी जाणे - दुःखद वास्तव - नकली दारूमुळे तरुणांचे आरोग्य धोक्यात आले असून, अनेकांना यकृत निकामी होणे, अंधत्व येणे आणि मृत्यूचा सामना करावा लागत आहे. नुकतेच घडलेले काही अपघात व अकस्मात मृत्यू याच 'डी' मालशी संबंधित असल्याची माहिती मिळत आहे.

दारूच्या नशेत अपघाताचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या अधिक आहे, हे विशेष लक्षवेधी आहे.
'डी' माल कुठून येतोय? कोण पाठीशी घालतोय? दारूचे हे खोके कुठून येतात, कोण पोचवतो आणि कोण विकतो - हे सर्व स्पष्ट असूनही, कार्यवाहीचा अभाव म्हणजेच कुठेतरी संगनमत असल्याची शक्यता. प्रशासनातील इतर यंत्रणांनी जरी वेळोवेळी हालचाली दाखवल्या, तरी राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र ठोस कारवाईपासून दूर आहे.

सामाजिक संस्थांचा इशारा - आता पुरे!
या विषारी साखळीवर लगाम घालण्यासाठी सामाजिक संस्था, तरुण मंडळे आणि नागरिक आता एकवटू लागले आहेत. जर लवकरच कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.
निष्कर्ष: नांदगावात दारू विकणारे भरभरून मिळत आहेत, पण पिणाऱ्यांचे प्राण मात्र दिवसेंदिवस हरवत आहेत.
'डी' मालावर तात्काळ बंदी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाची झोप मोडणे आता काळाची गरज आहे - अन्यथा याचे परिणाम थेट प्राणघातक ठरतील.

## अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

### रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल प विकसित करण्याचा निर्णय

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळा-वेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.




राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा मंत्री श्री. आबिटकर यांनी घेतला. यावेळी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.दयानंद जगताप, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ. रवींद्र शेटे आदि उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मंत्री श्री.आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले.

या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल प विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी सांगितले.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात याव्यात. तसेच आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही मंत्री. श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले.

रुग्णालयांना मार्च महिन्यापासून सुमारे १,३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे सांगून, यापुढेही आवश्यक निधी वेळोवेळी दिला जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी पूर्ण पारदर्शकपणे केली जावी आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले.



## निर्मल हास्य केंद्रातर्फे पर्यावरण प्रेमींचा सत्कार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

किरण घायदार, नाशिक- ३० - ४० वर्षांपूर्वी नाशिकची ओळख थंड हवेचे ठिकाण म्हणून केली जात होती .परंतु विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जुन्या देशी झाडांची कत्तल करण्यात आली व आज नाशिकचे तापमान ४० हुन अधिक झाले आहे. अशा परिस्थितीत देखील नाशिक मधील काही पर्यावरण प्रेमी निस्वार्थ भावने-ने वृक्षारोपण करून झाडे जगवत आ-हेत .अशा सर्वांचा इंदिरानगर येथील अजय मित्र मंडळ येथील निर्मल हास्य केंद्राने सत्कार केला. पर्यावरण प्रेमी डॉ संदीप भानोसे, नंदू काळे, संजय फडके, श्रीपाद कुलकर्णी ,सौ श्रद्धा जोगळेकर, निलय जोगळेकर व राहुल पांढुरलीकर यांचा सत्कार संपन्न झाला. निर्मल हास्य केंद्राचे सदस्य गीता पोळ ,शैलजा कुलकर्णी, दिनकर कुलकर्णी, परश-राम सोनवणे ,अरुण चुंबळे ,दत्ता जोशी रंजना जोशी ,रमेश देसाई व रमेश करवीर व इतर दीडशे कार्यकर्ते उपस्थित होते.
शेवटी सर्वांनी मिळून वाहतूक सुरक्षा व पर्यावरण रक्षा अभियानात सहभाग नोंदवत २५८० सातत्यपूर्ण दिवस पूर्ण केले.

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.

✽ संपादक ✽

मो. क्र. ९५४५९ १०१७७/८९९९९२१९९४

# भाषा ही संस्कृतीची आस्था असल्याने तीचा धर्माशी काहीही संबंध नाही

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भारतातील प्रत्येक भाषा संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आहेत; ज्याप्रमाणे गंगा, यमुना, कावेरी, गोदावरी, तापी, कृष्णा, नर्मदा इत्यादी अनेक नद्यांच्या सोज्वळ आणि निर्मळते मधुनच भारतीय भाषेचा उगम झाला आहे.त्यामुळे त्याला धर्माशी जोडता येणार नाही.आपण जगात कुठेही जा परंतु भारतीय संस्कृती, भाषा,वेगवेगळे रहाणीमान, खानपान, व्यंजनाचे वेगवेगळे प्रकार या संपूर्ण परंपरा हजारो वर्षांपासून भारतातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहे आणि तीच परंपरा आताही सुरूच आहे.भाषा ही विचारांच्या देवाणघेवाणीचे एक मोठे माध्यम आहे. तिच्या माध्यमातून विविध आचार-विचार आणि श्रध्दा असलेले लोक जोडले जातात.ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनू नये,अशी अपेक्षा व्यक्त करत नगरपरिषदेच्या क्षेत्रात राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेची परिचित असेल तर किमान नगर परिषदेच्या फलकावर अधिकृत भाषेव्यतिरिक्त म्हणजेच मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरल्यास कोणताही आक्षेप नसावा असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.भारतात अनेक धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे भाषा आणि धर्म याचा कुठेही संबंध जुळुच शकत नाही.कारण भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत त्या-त्या अनुषंगाने भाषेचे सुध्दा वर्णन होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्रांतील मराठी, गुजरात मधील गुजराती, तामिळनाडू मधील तामिळ अशा प्रकारे प्रत्येक राज्यात भाषेचे आगळेवेगळे रूप दिसुन येते व त्याची गणना समाजामध्ये होते.इंग्रजी भाषा ही इंग्रजांनी भारतावर लादलेली भाषा आहे.त्यामुळे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील संपूर्ण भाषांची नाळ भारतभूमीतच गाडली आहे. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेतील फलकावर उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली उर्दू भाषा हा धर्म नाही.ही लोकांमध्ये फूट पाडण्याचे कारण बनू नये.उर्दू हे गंगा-यमुना संस्कृती (गंगा-जमुनी तहजीब) किंवा हिंदुस्थानी संस्कृतीचे उत्तर उदाहरण आहे, असे हा निकाल देताना



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.भाषा म्हणजे कोणताही धर्म नाही ती धर्माचे प्रतिनिधित्वही करीत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भाषा म्हणजे एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे.उत्तर आणि मध्य भारतातील मैदानी भागांचे मिश्र सांस्कृतिक स्वरूप असलेल्या गंगा-यमुना संस्कृती किंवा हिंदुस्थानी तहजीबचे उत्तम उदाहरण असलेल्या उर्दूच्या बाबतीतही हेच आहे. सर्वोच्च न्यायालय म्हणतो की, उर्दू ही भारतासाठी परकी आहे, या गैरसमजातून उर्दूविषयीचा पूर्वग्रह निर्माण झाला आहे. उर्दू हीदेखील मराठी आणि हिंदीप्रमाणेच इंडो-आर्यन भाषा आहे व या भूमीत जन्माला आलेली ही भाषा आहे अशा स्पष्ट शब्दात सांगितले.भाषेचा विरोधच करायचा असेल तर इंग्रजी भाषेचा करावा आणि करायला पाहिजे. कारण देशातील इतर भाषांना इंग्रजी भाषा पोखरत असुन देशात घर करण्याचा प्रयत्न करीत आहे याकडे भारतीयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज भारतातील प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.याहीपलीकडे आपण गेलो तर प्रत्येक राज्याच्या ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला तेथील भाषा,रहनसहन आणि संस्कृती यांचेही आगळेवेगळे दर्शन होते.म्हणजे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील प्रत्येक भाषा हिंदुस्थानच्या रक्तात आणि नसानसामध्ये दिसून येते.त्यामुळे उर्दू भाषा भारतीयांसाठी नवीन नसुन ती आपलीच आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील प्रत्येक भाषा ही दैवी देण असुन ती सर्वांनीच स्विकारली पाहिजे.कारण हिंदू,बौद्ध,शिख, ईसाई, मुस्लिम या संपूर्ण धर्मांच्या साधुसंतांनी, महाज्ञानी, तपस्वी यांच्या परिश्रमातूनच भारतातील प्रत्येक भाषेचा उगम झाला आहे व ते सर्वांचेच श्रध्दा स्थान आहे. त्यामुळे भारतातील कोणतीही भाषा धर्माशी जोडली जावू शकत नाही.भाषा ही ईश्वरी देण आहे तीचा आदर व्हायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्यातील भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा यामुळे प्रत्येक राज्यातील मातृभाषा सुरक्षित राहील.कारण मातृभाषा ही कोणाही कडून शिकविली जात नाही ती जन्मताच अवगत होत असते म्हणूनच तिला मातृभाषा म्हटल्या जाते.त्यामुळे देशातील संपूर्ण भाषा, मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषेचा आदर सर्वांनीच केला पाहिजे.यामुळे देशातील संपूर्ण भाषा व बोली सुरक्षित राहील.जय हिंद!

# साकोरा येथील कपिल मोरे यांची एम.पी.एस.सी. परीक्षेत मजल

## शिधावाटप नियंत्रक व अन्नपुरवठा विभागात मुंबई संचालनालय कार्यालय, निरीक्षक म्हणून निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

ज्ञानेश खरे/मालेगाव- सकोरा येथील भूमिपुत्र माजी सैनिक कपिलनाथ विश्वनाथ मोरे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत शिधावाटप नियंत्रक व नागरी पुरवठा संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई कार्यालय येथे निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल पंचक्रोशीतील सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे . भारतीय सैन्यातून सेवानिवृत्त होऊन एमपीएससीचा अभ्यास करत त्यांनी या परीक्षेत घवघवीत संपादित केलेला आहे . यापूर्वी देखील पीएसआय पदी निवड झाली होती परंतु देश सेवेचा वसा आणि व्रत घेऊन सैन्य भरतीत ते दाखल झाले , परंतु आता उर्वरित वेळेत मात्र आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या अभ्यासाला थांबा न देता उर्वरित वेळ अभ्यासात घालवून या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले . आणि तरुणांपुढे एक नवीन आदर्श उभा केला , साकोरा पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदना चा वर्षाव होत आहे.



# न्यू ब्लॉसम्स् मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - येथील न्यू ब्लॉसम्स् इंग्लिश मिडियम स्कूल व समर्थ प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योती माठा, पूजा निकम, समन्वयक माधवी सहाय यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करुन महामानवास अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या शिक्षिका जयश्री नेवगे, खापरे मॅडम यांनी आपल्या मनोगतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण, संविधान निर्मिती मधील योगदान, आणि सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. तर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणे व गीतांद्वारे बाबासाहेबांचे जीवन चरित्र सादर केले.

महामानवाच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांचा वैचारिक विकास व्हावा व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या सदहेतूने डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छ.शिवाजी महाराज, महात्मा गांधी, विज्ञान,बोधकथा यांचा समावेश असलेली ग्रंथालयातील पुस्तके विद्यार्थ्यांना वाटप करून वाचन करण्यास प्रवृत्त करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली कामडे यांनी केले. तर नेहा पुंड यांनी आभार प्रदर्शन केले.

# डॉ. साहेबराव निकम यांचा इंग्रजी भाषेतील संदर्भ ग्रंथ अमेरिकन प्रकाशन संस्थावतीने प्रकाशित



**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिकरोड : येथील गोखले एज्युकेशन सोसायटीचे बिटको महाविद्यालय येथील अकाउंटन्सी विभागप्रमुख डॉ.साहेबराव दौलत निकम , आवनखेड यांचा टोमॅटो प्रोडक्शन अँड मार्केटिंग या विषयावरील इंग्रजी भाषेतील संदर्भ ग्रंथ अमेरिकेत (युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका ) मधील प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला .त्यानिमित्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ.कृष्णा शहाणे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या वतीने सत्कार केला, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ.अनिल कुमार पठारे, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. कल्याणराव टकले, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. आकाश ठाकूर , सर्व प्राध्यापक, ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे, समितीचे पदाधिकारी तसेच सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जावळे इलेव्हनने पटकावला शिंदे पाटील चषक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : येथील शिंदे पाटील फाउंडेशन च्या वतीने आयोजित राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद अर्जुन जावळे इलेवन संघाने पटकावले. चषकासह १ लाख ५१ हजारांचे पारितोषिक त्यांना प्रदान करण्यात आला.चाळीसगाव येथील आझाद इलेव्हन संघ उपविजेता ठरला. १०१ गरीब कुटुंबाना महिनाभर पुरेल इतका किराणा वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिंदे पाटील फाउंडेशनची ही स्पर्धा राज्यभर लोकप्रिय झाली आहे.या राज्यस्तरीय स्पर्धेत ६४ संघांनी सहभाग घेतला होता.विशेष म्हणजे राज्यभरातून तसेच मध्यप्रदेश,राजस्थान,गुजरात येथीलही काही खेळाडूंनी वेगवेगळ्या संघातून सहभाग नोंदवत खेळाचे सादरीकरण उत्कृष्ट खेळ सादर केला. रोज साखळी सामने घेतले गेले.स्पर्धेच्या सेमी फायनलमध्ये प्रामूख्याने चार संघ आले.पहिला सेमी फायनल मान इलेव्हन येवला विरुद्ध आझाद चाळीसगांव यांच्यातील अटीतटीच्या सामन्यात आझाद इलेव्हन विजय झाले. दुसऱ्या सेमी फायनलमध्ये प्रथमेश रॉयल इलेव्हन विरुद्ध अर्जुन जावळे इलेव्हन यांच्यात होऊनजावळे इलेव्हन संघ विजय झाला.त्यामुळे अंतिम सामना अर्जुन जावळे इलेव्हन विरुद्ध चाळीसगाव येथील आझाद इलेव्हन संघात रंगला. चुरशीच्या झालेल्या या सामन्यात जावळे इलेव्हनने सहा षटकात ७१ धावाचे लक्ष ठेवले होते. मात्र शेवटच्या चेंडूपर्यंत सामना रंगला पण आझाद संघाला उद्दिष्ट पूर्ण करण्यात अपयश आले. विजेत्या अर्जुन जावळे प्रथम पारितोषिक १ लाख ५१ हजार रुपये रोख व चषक माजी नगरसेवक गणेश शिंदे यांच्या तर्फे




देण्यात आले. उपविजेत्या आझाद संघाला एक लाख रुपयांचे द्वितीय बक्षीस सुनील शिंदे यांच्यातर्फे तर डॉ.सुजित येलमामे यांच्या प्रथमेश इलेव्हन संघाला ७७ हजार रुपयाचे तृतीय पारितोषिक युवा नेते कुणाल दराडे यांच्यातर्फे तर मान इलेव्हनला ५५ हजार रुपयांची चतुर्थ पारितोषिक समीर समदडिया यांच्यातर्फे देण्यात आले. अंतिम सामन्याचा सामनावीर बबलू पाटील ठरला तर पूर्ण स्पर्धेचा मालिकावीर कृष्णा गवळी हा ठरला. अंतिम सामनाविर व मालिकाविरास गदा देण्यात आली.विजेत्या संघाच्या संघमालकास शिंदे पाटील फाउंडेशनच्या वतीने देण्यात आलेले बुलेटचे बक्षीस अर्जुन जावळे यांना देण्यात आले.शिक्षक आमदार किशोर दराडे,ज्येष्ठ नेते माणिकराव शिंदे,मनमाडचे उपविभागीय अधिकारी बाजीराव महाजन यांनी अतिम सामन्याला उपस्थिती होती.शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष कुणाल दराडे, भाजपाचे युवा जिल्हाध्यक्ष समीर समदडीया,बंडु पहिलवान क्षिरसागर,झामभाऊ जावळे,अल्केश कासलीवाल, भाजपाचे तालुकाध्यक्ष नाना लहरे, फाउंडेशनचे अध्यक्ष, नगरसेवक गणेश शिंदे, सुनिल शिंदे, सचीव संजय शिंदे, अमोल शिंदे, प्रशांत शिनकर, राजेंद्र बाकळे,सुशांत हजारे, दिपक गुप्ता, राजेंद पवार आदींच्या उपस्थितीत विजेत्यांना परितोषिक वितरण करण्यात आले.फाउंडेशनचे दिपक घिगे,प्रशांत गोराणे,नानटी नागपुरे, मंगेश नागपुरे, किशोर पराते, बाळु क्षत्रिय, चंगूदादा पाटोळे, कुशल नाकोड, रमेश सांबर,संदीप शिंदे, गणेश शिंदे, तुषार शिंदे, संतोष मोडवे, हरी नागपुरे, अजय शिंपी, पिंटू माळी, दीपक उमरवाल,पप्पू वाणी, रहीम पठाण, जमील पठाण, अमन पठाण, सार्थक कांदळकर, मयूर पवार, हितेश शहारे, अक्षय शहारे, तेजस शिंदे, संदीप धोत्रे, विकी खानापुरे, निखिल मिस्कीन, नितीन कुक्कर, रोहित कुक्कर,, शुभम कप्पे, अतुल भालेरे, रोहीत शिदे, क्षितीज नाकील, बाळा नागपुरे, गणेश भावसार, गणेश पवार तसेच सेच खंडु वस्ताद तालीम संघ, जाणता राजा मित्रमंडळ पाटील फ्रेण्ड सर्कल लबक फ्रेण्ड सर्कल खबरदार मित्र मंडळ जागृती क्रिकेट क्लबआदीनी स्पर्धेचे नियोजन केले.सुत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले.

*गिरीश महाजन यांच्याकडून स्पर्धेचे कौतुक

या स्पर्धेला ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी व्हिडिओ कॉलद्वारे शुभेच्छा देत कौतुक केले.

ग्रामीण भागात अशा पद्धतीने रात्रीचे सामने भरून तरुण खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचा हा स्पर्धेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेचे आयोजक गणेश शिंदे व सहकार्यांनी सामाजिक बांधिलकी जपत राज्यभरातील खेळाडूंना दिलेली संधी कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

*स्पर्धेदरम्यान महिलांना देखील प्रश्नमंजुषेने पैठणी साडी व वनग्राम गोल्ड नेकलेस व उत्तेजनार्थ आठ पारितोषिके फाउंडेशनच्या वतीने देण्यात आले सायली खंदारे पैठणी विजेत्या तर एक ग्रॅम गोल्डची मानकरी प्रियंका युवराज शिंदे ह्या ठरल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

## त्र्यंबक डोंगरे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव (प्रतिनिधी) - नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे विद्यमान अध्यक्ष व क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था नाशिक संस्थेचे संचालक त्र्यंबक महादू डोंगरे यांना महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे तसेच शिक्षण मंत्री ना.दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.



त्र्यंबक महादू डोंगरे (सर) यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे यामुळेच त्यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक हा पुरस्कार दिला जात आहे. यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर वडाळी बुद्रुक येथे मुख्याध्यापक म्हणून यशस्वी कारकीर्द निभावली. त्याचबरोबर नाशिक जिल्हा टी. डी.एफ. चे कार्यवाह, नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ चे उपाध्यक्ष, एनडीएसटी सोसायटीचे तज्ञ संचालक, नांदगाव विज्ञान अध्यापक संघाचे कार्यवाह या पदावर त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. तालुक्यातील शिक्षक व विद्यार्थी यांना नेहमी मदत करतात. या सर्व शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना २६ एप्रिल रोजी पालघर येथे आयोजित कार्यक्रमात राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या निमित्ताने तालुक्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी तसेच राजकीय सामाजिक शैक्षणिक कृषी क्षेत्रातील नागरिकांकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## व्यक्तिमत्व घडविण्यासाठी खेळ आणि करिअर घडविण्यासाठी अभ्यासाला महत्त्व द्या - आमदार किशोर दराडे

### मातोश्री फार्मसीत आयोजित फार्मा चषक पटकावला कोळपेवाडी संघाने

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना अभ्यासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी खेळाचे प्रचंड महत्त्व आहे.खेळाची आवड विद्यार्थ्यांना शिस्त, नेतृत्व व संघ भावना शिकवते.त्यामुळे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी खेळ आणि करिअर घडविण्यासाठी अभ्यासाला महत्त्व द्या असे प्रतिपादन मातोश्री शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा शिक्षक आमदार आमदार किशोर दराडे यांनी केले. धानोरे येथील मातोश्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे राज्यस्तरीय आमदार फार्मा चषकचे आयोजन करण्यात आले होते.सदर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी श्री.दराडे बोलत होते महाविद्यालयाचा प्राचार्या डॉ.रसिका भालके-वारुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कोळपे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,कोळपेवाडी (ता. कोपरगाव) या महाविद्यालयाने आमदार



फार्मा चषक पटकावला. महाविद्यालयाचा प्राचार्या डॉ.रसिका भालके-वारुळे म्हणाल्या की विद्यार्थ्यांचा जीवनामध्ये खेळ असेल तर त्यांचा शारीरिक व बौद्धिक क्षमतेमध्ये नक्कीच वाढ होते व खेळाडू वृत्ती जोपासण्याकरिता महाविद्यालयाने हा उपक्रम हाती घेतला आहे. या स्पर्धेसाठी राज्यातील पुणे, अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आदी विविध २४ फार्मसी महाविद्यालयातून संघ खेळण्यासाठी आले होते. आठ दिवस अतिशय चुरशीच्या वातावरणात सामने रंगले. यादरम्यान चौकार-षटकारांची आतषबाजी, उत्कृष्ट गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणही पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्य पणाला लावून खेळ सादर करत जिंकण्यासाठी मेहनत घेतली. सदर स्पर्धेमध्ये २१ हजार व चषकाचे प्रथम पारितोषिक व डॉ. कोळपे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कोळपेवाडी महाविद्यालयाने पटकावले.द्वितीय पारितोषिक चषक व ११ हजार रुपये हे श्रेयस कॉलेज ऑफ फार्मसी छत्रपती संभाजीनगर यांना मिळाले तर तृतीय पारितोषिक चषक व ७ हजार रुपये एसएनडी कॉलेज ऑफ फार्मसी येवला यांनी पटकावले. विजेत्या संघांना प्राचार्य डॉ.रसिका भालके वारुळे यांचा हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सदर प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. समन्वय प्रा. प्रसाद सातळकर, प्रा.चिन्मय कपिले, प्रा.अन्सारी, सुयोग इलग यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अजिंक्य पोटे यांनी केले.

## 'सजना' चित्रपटाचं धमाल गाणं 'बुंगा फाईट' सर्वत्र घालतंय धुमाकूळ !!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मराठी गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर एक चांगला ट्रेंड सेट केलाय. सर्वत्र मराठी गाणी वाजताय आणि गाजताय सुद्धा. अशातच आणखी एका मराठी गाण्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय. शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं बुंगा फाईट हे मराठी गाणंही आता रसिकांच्या पसंतीस उतरतंय. त्यामुळे सोशल मीडियावर सध्या याच गाण्याची चर्चा सुरु आहे.

सजना चित्रपटातला बुंगा फाईट हे गाणं एक पॉप्युलर डान्स नंबर ठरत आहे ह्यात काही शंका नाही. प्रेक्षक आत्ताच ह्या गाण्यावर



थिरकायला लागली आहेत. अनेक कार्यक्रमांमध्ये हे गाणं वाजतय, प्रेक्षक डान्स करताना दिसत आहेत. अशातच आता प्रेक्षकांना हे गाणं लाईव्ह सुद्धा ऐकायला मिळालं. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे ह्यांनी हे गाणं गायलं आहे आणि नुकतच त्यांनी प्रेक्षकांचं लाईव्ह मनोरंजन केलं आणि त्यांना प्रचंड चांगला प्रतिसाद मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आपल्या चाहत्यांसाठी त्यांनी वेग वेगळ्या ठिकाणी परफॉर्म केलं. 'सजना' सिनेमातील बुंगा फाईट हे गाणं नक्कीच प्रेक्षकांना वेड लावत आहे हे आनंद शिंदे ह्यांनी पटवून दिलय. इतकच नव्हे तर ह्या गाण्यानी २.५ मिलियन व्युजचा आकडा पार केलाय.

गावरान भाषा आणि लोकसंगीताची छाप या गाण्यात पहायला मिळते. बुंगा फाईट या गाण्याला ओंकारस्वरूप ह्यांनी संगीत दिलं आहे. तर सुहास मुंडे यांचे शब्द आहेत. 'सजना' चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. 'सजना' २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

## स्कोडा ने ऑल-न्यू स्कोडा कोडियक कार केली लाँच

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : स्कोडा कायलॅक श्रेणीच्या यशस्वी लाँचनंतर स्कोडा ऑटो इंडिया आता त्यांची लक्झरी ४४ एसयूव्ही कोडियकच्या ऑल-न्यू



जनरेशनच्या लाँचसह स्पेक्ट्रमच्या दुसऱ्या बाजूस नवीन कारची घोषणा करत आहे. भारतात व जगभरात सेकंड जनरेशन असलेली नवीन कोडियक लक्झरी, सुधारणा, ऑफ-रोड क्षमता, ऑन-रोड गतीशीलता आणि सात-आसनी विविधतेच्या सिग्नेचर संयोजनासह भारतामध्ये लाँच करण्यात आली आहे. त्याची कोडियाक स्पोर्टलाइन (एक्स-शोरुम)ची किंमत ४६,८९,००० आणि सेलेक्शन एल अँड के ची किंमत ४८,६९,००० आहे. बुकिंग्जना आजपासून सुरूवात, तसेच ग्राहक डिलिव्हरीजना २ मेपासून सुरूवात होईल.

एर्गो फ्रंट सीट्समुळे लक्झरी स्टँडर्ड आणखी वाढला आहे, ९ एअरबॅग्ज, स्लाइडिंग पॅनोरेमिक सनरूफ आणि सर्वोत्तम ऑडिओ अनुभवासाठी ७२५ वॅट कॅन्टॉन साऊंड सिस्टमसोबत १३ स्पीकर्स व सब-वूफर यासह सुरक्षितता व आरामदायीपणाला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, रिअर विंडोजमधील रोलिंग सबब्लाइण्ड्स गोपनीयता आणि प्रवासी आरामदायीपणामध्ये अधिक वाढ करतात.

ऑल-न्यू कोडियक सहा रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे: मून व्हाइट, मॅजिक ब्लॅक, ग्रॅफाइट ग्रे, वेल्वेट रेड, रेस ब्ल्यू. याव्यतिरिक्त, सिलेक्शन एलअँडके व्हेरिएण्ट विशेष ब्रॉन्क्स गोल्ड रंगामध्ये उपलब्ध आहे आणि स्पोर्टलाइन विशेष स्टील ग्रे रंगामध्ये उपलब्ध आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक पीटर जनेबा म्हणाले, ''मार्चमध्ये आम्ही भारतात आतापर्यंतच्या सर्वाधिक मासिक विक्रीची नोंद केली, ज्याला कायलॅक लाँचमुळे गती मिळाली आणि कुशक व स्लाव्हियाचा पाठिंबा मिळाला. हे आम्ही या वर्षात स्थापित करण्याचा मनसुबा ठेवलेल्या अनेक नवीन रेकॉर्ड्सपैकी एक आहे. आमच्या उत्पादन ऑफेन्सिव्ह धोरणाशी बांधील राहत ऑल-न्यू कोडियकच्या लाँचमधून स्कोडाची लक्झरी व तंत्रज्ञान क्षमतेसह आमच्या उत्पादन स्पेक्ट्रमची दुसरी बाजू दिसून येते.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरगाणा तालुक्यात लोक सहभागीय सुक्ष्म नियोजन कार्यक्रम

**दै. आवाज वृत्तसेवा...**



लक्ष्मण पवार, हतगड. सुरगाणा तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प लोक सहभागीय सुक्ष्म नियोजन कार्यक्रम मशाल फेरी काढून जनजागृती करण्यात आली.त्यात बदलणाऱ्या हवामानास जुळवून घेण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करणे आशा परिस्थितीत त्यासाठी आधुनिक तंत्राचा अवलंब करून संसाधनाचा कार्यक्षम वापर करणे या उद्देशाने पोकरा अर्थात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प केज -२ योजना चालु केली.सुरगाणा तालुक्यातील अंबाठा, डोलाऱ्हे,सुळे, वांगण,बाफळून, गावातून मशाल फेरी,प्रभात फेरी, शिवार फेरी,काढण्यात येऊन गावस्तरीय हवामान अनकुल आराखडा उपक्रमाची सुरवात करण्यात आली.गावामध्ये दुष्काळी, अवकाळी पाऊस व पाण्याची असणारी टंचाई, पिकांचे मोठे नुकसान होते.शेतकऱ्यांना यावर उपाय योजना याव्या.स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने लोकसहभागातून सुक्ष्म नियोजन राबविले जात आहे.यात शिवार फेरी संसाधन नकाशे तयार करणे जलसंधारणाचे नियोजन आणि हवामान अनुकूल,पीक पद्धतीवर भर दिला जाणार आहे.प्रत्येक गावात ग्रामसभेच्या माध्यमातून ग्राम कृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे.या समिती कडून प्रकल्पअनंतर्गत प्राप्त अर्जाना मंजुरी देण्याची कारवाई देण्यात येईल.अशी जनजागृती करण्यात आली. यावेळी मंडळ कृषी अधिकारी भोये,कृषी पर्यवेक्षक विलास भोये,कृषी सहाय्यक गुलाब भोये,संगीता चौधरी,हरी गावित, राधा सहारे,व ग्रामस्थ उपस्थित होते.

## कागल शहरातील सिटी प्राईड हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सिटी स्कॅन सेंटरचे उद्घाटन





**दै. आवाज वृत्तसेवा...**

नामदेव गुरव/आनूर - वैद्यकीय शिक्षण मंत्री नामदार हसन मुश्रीफ यांच्या हस्ते केले उद्धाटन सिटी प्राइड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कागल हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल शहरात असलेले एक मोठे रुग्णालय असून, या रुग्णालयात अनेक प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत, ज्यात जनरल सर्जरी, लॅप्रोस्कोपिक सर्जरी, ऑर्थोपेडिक्स, गायनॅकॉलॉजी, ईएनटी (ENT), युरोलॉजी आणि गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी यांचा समावेश असून हे रुग्णालय आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असून सध्या सिटी प्राईड हॉस्पिटल कागल येथे अत्याधुनिक सिटी स्कॅन मशीनरी घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री नामदार हसन मुश्रीफ यांच्या हस्ते हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सिटी स्कॅन सेंटरचे उद्घाटन केले. यावेळी केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैयासाहेब माने, श्रीनाथ समूहाचे चंद्रकांत गवळी, माजी उपनगराध्यक्ष बाबासाहेब नाईक, कागल शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संजय चितारी, विवेक लोटे, अँड. संग्राम गुरव, सम्राट सनगर, पत्रकार नामदेव गुरव यांच्यासह मान्यवर व हॉस्पिटलचे डॉक्टर व स्टाफ उपस्थित होते.



# शिवसेनेच्या रस्ता रोकोच्या इशाऱ्यानंतर कोटमगावला वीज पुरवठा सुरळीत

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : जगदंबा मातेचे देवस्थान असलेले कोटमगाव (ता.येवला) येथील शेतकऱ्यांचा वीजपुरवठा अचानकपणे खंडित करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठच चोळले ले शेतीला आधीच पाण्याची कमतरता असल्यामुळे शेतकरी टप्प्याटप्प्याने शेतीला पाणी देत आहे.अशा परिस्थितीत महावितरण कंपनीने येथील शेतकऱ्यांना अचानकपणे मोठा शॉक दिला गेल्या ४० वर्षापासून शहराशी जोडली असलेली अर्बन लाईन ही कोटमगावला देखील देण्यात आलेली आहे त्यामुळे कोटमगाव येथे नियमित वीज पुरवठा सुरळीत असतो परंतु अचानकपणे येथील कार्यकारी अभियंता जाधव यांनी सहकाऱ्यांना सोबत घेऊन गावचा सुरळीत चालू असलेला वीजपुरवठा कट करून तालुक्यातील ग्रामीण भागातील सबस्टेशनला कोटमगाव येथील वीजपुरवठा जोडून देण्यात आला यामुळे येथील शेतकऱ्यांचा संताप अनावरण झाला त्यांनी येथील आमदार किशोर दराडे



व शिवसेना तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांच्याशी संपर्क केला झालेला सर्व प्रकार सांगून आमच्यावरती महावितरण कंपनीने अचानकपणे अन्याय केला आहे याबाबत आम्हाला अधिकाऱ्यांकडून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी आमदार दराडे व तालुका प्रमुख शेळके पाटील यांच्याकडे केली घटनेची तात्काळ दाखल घेऊन संबंधित विभागाचे मुख्य अधिकारी जाधव यांना तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांनी संपर्क करून आमदार दराडे यांच्या संपर्क कार्यालय वरती बोलावून घेतले शेतकऱ्यांचा विषय त्यांना सांगून तात्काळ वरिष्ठ पातळीवरती हा विषय बोलून लवकरात लवकर सोडवा असे सांगण्यात आले यावर मनमाड येथील मुख्य कार्यकारी अभियंता तडवी व येवला ग्रामीण पोलीस निरिक्षक संदीप मंडलिक यांच्या उपस्थित याबाबत सविस्तर चर्चा करून कोटमगाव येथील शेतकऱ्याचा प्रश्न तात्काळ सोडवा अन्यथा रास्ता रोको करण्यात येईल असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आला तडवी यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधित येवला विभागाचे अधिकारी जाधव यांना सांगण्यात आले की तात्काळ वीजपुरवठा सुरू करा लवकरात लवकर शेतकऱ्यांशी

शेतकऱ्यांवरती आम्ही अन्याय होऊ देणार नाही महावितरण कंपनीची मनमानी तालुक्यात आम्ही सहन करणार नाही ४० वर्षांपूर्वीचा सुरळीत सुरू असलेला वीज पुरवठा अचानकपणे खंडित करण्यामागे कोणाचा हात आहे की काय अधिकाऱ्यांच्या उडवा उडवीच्या उत्तरामुळे आम्हाला पडला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत कोणीही राजकारण करू नये महावितरण कंपनी व पोलीस प्रशासनाने देखील सहकार्य करावे.
– पांडुरंग शेळके पाटील शिवसेना तालुका प्रमुख येवला.

आमचा अचानकपणे वीजपुरवठा खंडित केल्यामुळे शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी,जनावरांना पिण्याचे पाणी देणे कठीण झाले होते आम्हाला संबंधित विभागाकडून कुठलीही पूर्व सूचना मिळाली नसल्यामुळे आमच्या गावात गोंधळ निर्माण झाला होता आणि त्यात अधिकारी सहकार्य करत नसल्यामुळे आम्हाला येथील आमदार किशोर दराडे व शिवसेना तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके पाटील यांच्याकडे धाव घ्यावी लागली अन्यथा आम्हाला वीजपुरवठा मिळाला नसता शिवसेना पक्षाचे व महावितरण कंपनीचे आम्ही आभार व्यक्त करतो – गोकुळ कोटमे शेतकरी कोटमगाव

बैठक घेऊन पुढील निर्णय घेऊ असे सांगण्यात आले यावेळी वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर शेतकऱ्यांनी येवला तालुका शिवसेनेचे आभार मानले.यावेळी रावसाहेब कोटमे गोकुळ कोटमे भाऊसाहेब सोमासे गणेश कोटमे,आबा गव्हाणे, अशोक लहरे, अंबादास लहरे,योगेश ठोंबरे, संजय कोटमे,अनिल लहरे,दिलीप कोटमे,संतोष कोटमे.यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विष्णूनगर येथील जि.प.शाळेच्या आदित्य गायकवाडचे मंथन परीक्षेत यश

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर – विष्णूनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिलीतील विद्यार्थी आदित्य योगेश



गायकवाड याने मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत १२८ गुण मिळाल्याने राज्यात १२ व्या क्रमांकाची राज्यस्तरीय रँक व जिल्ह्यात ७ व्या क्रमांकाची जिल्हा रँक मिळवली.आदित्यला शाळेचे मुख्याध्यापक विलास फंड, वर्गशिक्षक विष्णू मापारी व पालक योगेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.आदित्यच्या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती , विष्णूनगर ग्रामस्थांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## आदर्श प्राथमिक शाळा कांचनगाव येथील विविध भौतिक सुविधांचे लोकार्पण





**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक – इगतपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा कांचनगाव येथे कन्सर्न इंडिया फाउंडेशनचा मदतीने दोन फेजमध्ये काम पूर्ण करण्यात आले. पहिल्या फेजमध्ये मुख्य इमारतीच्या वरील टेरेसवर हॉल बांधून, स्टेज बांधकाम, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

दुसऱ्या फेजमध्ये मुलींचे शौचालय, शाळे तील सर्व दरवाजे, खिडक्या, भिंतींना प्लास्टर, संपूर्ण शाळेत रंगकाम, आतून बाहेरून डिजिटल पेंटिंग, स्ट्रीट लाईट, हॅन्ड वॉश स्टेशन, किचन शेड समोरील ओटा, फेव्हर ब्लॉक, शाळेचा व इमारतीचा मुख्य दरवाजा, शाळेस कपाटे, वॉलची दुरुस्ती व रंगकाम, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, विद्युतीकरणात दुरुस्ती, पंखे, बल्ब, जिना दुरुस्ती, संपूर्ण शाळेस कोटा फरची, सर्व खिडक्यांना ग्रील व स्लाइडिंग इ कामे कन्सर्न फॉउंडेशनने पूर्ण करून शाळेला नवीन रूप दिले. यासाठी अना मॅडम यांचे मोठे योगदान मिळाले.

यासाठी इगतपुरी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी निलेश पाटील व शिक्षण विस्तार अधिकारी किशोर सोनवणे व अशोक मुंढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कामासाठी शाळेतील मुख्याध्यापिका बागुल, पदवीधर शिक्षक .सुरेखा गुंजाळ, दत्तू साबळे, सुधाकर बाविस्कर, उपशिक्षक नामदेव साबळे, जितेंद्र भदाणे, विश्रांती वेताळ, सुमित्रा खैरनार, सुनंदा जाधव, अनिता शिरसाठ यांनी काम चालू असताना अतिशय महत्त्वाची योगदान दिले.

यासाठी मा.जि प सदस्य जनार्दन माळी, बाजीराव माळी, जनार्धन गव्हाणे, रंगनाथ गव्हाणे, गोरख गव्हाणे छाया मोरे, छाया गव्हाणे, रीना माळी, सखाराम नवले, सुनील चंद्रमोरे, नामदेव हीलम,कल्पना माळी, चंद्रवर्धन चंद्रमोरे, पंकज माळी, दिपाली गव्हाणे, सतीश गव्हाणे ,रामदास गव्हाणे , कॉन्ट्रॅक्टर विश्वास लंगडे, सचिन लंगडे इ चे सहकार्य मिळाले. लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मारिया मॅडम ,प्रमुख पाहुणे नीता मॅडम, शिल्पा मॅडम व पंकज आमले उपस्थित होते. शाळेच्या विकासासाठी कॅन्सर्न इंडिया फाउंडेशन ने जवळजवळ दीड कोटी इतका अंदाजे खर्च केला. शाळेचं रूप पालटण्यासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तू साबळे व सुरेखा गुंजाळ यांनी केले व आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नवनियुक्त तलाठ्यांच्या प्रशिक्षणाला सुरुवात, महसूलमध्ये कर्मचाऱ्यांना एआयचेही प्रशिक्षण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड : महसूल विभागाचे काम अधिक गतीशील करण्यासाठी नव्या दमाच्या तलाठ्यांना आता आर्टीफिशीयल इंटिलिजन्स अशा नव्या तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा यासोबतच ई -फेरफार व अन्य आवश्यक बाबींचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू झाले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यामध्ये ऑनलाईन उपक्रमासंदर्भात पुढाकार घेतला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ईफायलींगमध्ये अग्रेसित झाले आहे. त्यामुळे महसूल प्रशासनात दाखल झालेल्या नव्या १२२ तलाठ्यांच्या प्रशिक्षणामध्ये नवतंत्रज्ञानाचा महसूलमध्ये वापर संदर्भात आज दिवसभर प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, शरद वानखेडे, निळकंठ पाचंगे, संतोष निलावार यांच्यासह विविध तंत्रस्नेही अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण दिले महिन्याभरात शेत पांदण रस्त्यांचे अर्ज निकाली काढा विभागीय आयुक्तांचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी संवाद

कुणी शेतावर, कुणी बांधावर, कुणी दुकानात तर कुणी दुपारच्या उन्हात झाडाखाली खाटेवर पहुडलेला. मात्र तरीही विभागीय आयुक्त आपल्याशी बोलतात या उत्सुकतेपोटी शेकडो शेतकऱ्यांनी आज 'संवाद मराठवाड्याशी ' या कार्यक्रमात विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्याशी संवाद साधला. यावेळी नांदेड जिल्ह्याने शेतरस्ते, शिव रस्ता, पांदण रस्ते व शेतीच्या रस्त्यासंदर्भात सुरू केलेल्या कार्यवाहीला महिन्याभरात पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नांदेड जिल्ह्याने यासंदर्भात यापूर्वीच घेतलेल्या पुढाकाराचे कौतुकही केले

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी वेगवेगळ्या लाभांच्या व जिव्हाळ्यांच्या योजनासंदर्भात वेबिनारसत्र 'संवाद मराठवाड्याशी ' या उपक्रमांतर्गत सुरू केले आहे. विभागीय आयुक्त आपल्या







मोबाईलवर थेट उपलब्ध होत असल्याने ग्रामीण भागात त्यांच्या या उपक्रमाला प्रतिसाद असून आज ८ जिल्ह्यातील शेकडो शेतकरी आपल्या प्रलंबित शेतमार्गासाठी या वेबिनारमध्ये सहभागी झाले होते.

अर्जदार ,संबंधित तहसिलदार तसेच विभागीय आयुक्त एकाचवेळी उपस्थित असल्याने अनेक

प्रश्न त्याक्षणी त्यांनी सोडवले गेले.याशिवाय या रस्त्यासंदर्भात अर्ज करतांना घ्यावयाची काळजी यासंदर्भातील कायदे व विशिष्ट कालमर्यादेत हे कार्य पूर्ण करण्याबाबत यंत्रणेला विभागीय आयुक्तांनी दिलेली ताकिद यामुळे शेतकऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

नांदेड जिल्ह्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनात शेती संदर्भातील सर्व रस्त्यांसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी देखील यासंदर्भात बैठक घेऊन पांदण रस्ते व अन्य रस्त्यांचे प्रश्न मुख्यमंत्री महोदयांच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमात पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील अन्य जिल्ह्याच्या तुलनेत नांदेडमध्ये यासंदर्भात मोठ्याप्रमाणात कामे सुरू आहेत. जिल्हा प्रशासनाकडे आलेल्या १ हजार १२९ अर्जांपैकी ४२० रस्ते मोकळे झाले आहेत तर ७०९ रस्ते प्रलंबित आहेत. या अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही आज या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी दिली. आजच्या बैठकीला नांदेड येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी पूर्नवसन संजीव मोरे, तहसिलदार विपीन पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी रस्त्यासंदर्भातील एक दिवसाचा सेमिनार आयोजित करण्यात येईल. पावसाळ्याच्या आत सर्व रस्त्यांचे आदेश काढले जातील. यासाठी आयुक्त कार्यालयाने सुचविल्याप्रमाणे सस्ती अदालत आयोजित करण्यात येईल, असे स्पष्ट केले. विभागीय आयुक्तांनी महिनाभरात नांदेड मधील सर्व प्रकरणे निकाली काढण्याचे आदेश यावेळी दिले.